## घुसखोरी...

इथे लोक भरलेल्या
गच्च जेंट्स डब्यात
लेडीज घुसतात
पोराबाळांना घेऊन
धक्के लागले तरी
त्यांचे जेंट्स सांभाळतात
कमरेभोवती हात गुंडाळून
तर...
लगेजमध्ये बिनसामानाचे
जेंट्स घुसतात गर्दीतून
निदान उभे राहायला
जागा मिळेल म्हणून..
अन्...
स्लिपरच्या एक्सप्रेस डब्यात
बिनारिझर्वेशनवाले घुसतात
सरकून बसायला जागा
मिळेल म्हणून टोकाला
तेव्हा...
दंड करणारा टीसीही
चक्रावून जाईल अशा
शिकलेल्या प्रवाशांना
शिस्तीने खाली उतरवताना
हे होताना मात्र..
नियम सगळ्यांनाच
तर माहित असतात
नियम मोडताना...
पण तरीही नियम
कसेबसे बजावले जातात
नवीन अनुभव आले

की हेच नियम
बदलतही असतात..
रांगेतून घुसणारे आणि
पुढे जाण्याची वेगवेगळी
कारणं सांगत ढकलणारे
आयुष्यातही भेटतात
आपण मागे राहिल्यावर
मात्र त्यांच्या घुसखोरीला
अन् आपल्या दैवाला
आपण कोसत राहतो…

**सुरेंद्र पिसाळ**